**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया, प्रसिध्दी करिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५

प्रसिध्दी पत्रक. ०९
दिनांक : ०४.०७.२०१८

## बेस्टतर्फे त्वरित वीज जोडणी

मुंबई, ०४ - बेस्ट उपक्रमातर्फे विद्युत पुरवठा घेऊ इच्छिणा-या वीज ग्राहकांना त्वरित आणि विना विलंब वीज जोडणीसाठीच्या कार्यपध्दतीत आमूलाग्र बदल करण्यात आला असून ही सुधारित कार्यपध्दती अधिक सुलभ करण्यात आली आहे. या कार्यपध्दतीनुसार मागणी अर्जाची नोंद केल्यापासून वीज जोडणी सहा दिवसांत करण्यात येईल. या कार्यपध्दतीची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :-

१. कार्यपध्दतीतील टप्पे कमी करुन विलंब टाळण्यात आला आहे:-

**नोंदणी**- लिपिक एका दिवसात मागणी अर्जाची नोंद करेल.

**निरिक्षण** - अर्जदाराच्या जागेची तसेच तेथील किंवा जवळील सेवेची माहिती प्रभारी अभियंता पहिल्या पाहणीमध्ये नोंदवेल व या पाहणीत काही त्रुटी आढळल्यास त्याची माहिती अर्जदारास देईल तसेच या त्रुटी/कारणे गंभीर असल्यास अर्जदाराचा अर्ज रद्द करण्यात येईल. जर काहीच त्रुटी न आढळल्यास प्रभारी अभियंता अर्जदाराचा सदर अर्ज / मागणीपत्र पुढील २ दिवसात कार्यवाहीसाठी पाठवेल.

**मंजुरी** - त्यानंतर सदर अर्ज / मागणीपत्र मंजूर करण्यात येईल. वरील कार्यवाही एका दिवसात पार पाडण्यात येईल.

.....२

**पूर्तता व प्रदान-** प्रशासकीय अधिकारी किंवा पर्यवेक्षक किंवा लिपिक हे भरणा केलेल्या रकमेची यंत्रणेमध्ये (सिस्टिम) एक दिवसात नोंद करुन अर्जदाराच्या लायसन्स इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरच्या अहवालाची देखील यंत्रणेत नोंद करुन वीज जोडणी शुल्क आकारण्याकरिता कॅश काऊंटर क्लार्क कडे पाठविण्यात येईल. वीज जोडणी शुल्काचा भरणा केल्यानंतर कनेक्शन ऑर्डर आयएफ सेक्शनला पाठविण्यात येईल. वरील कार्यवाही एका दिवसात पार पाडण्यात येईल.

**वीजमापक बसविणे -** कनेक्शन ऑर्डर मिळाल्यानंतर एका दिवसात वीजमापक बसविण्यात येऊन यंत्रणेत नोंदविण्यात येईल व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी कागदपत्रे पुढे मुव्ह इन क्लार्ककडे पाठविण्यात येतील. तसेच ग्राहकास पहिले वीजदेयक जाईपर्यंत पाठपुरावा करण्यात येईल.

२. जालव्यूहामध्ये अतिरिक्त वीजभार टाकण्याची क्षमता असेल तर ग्राहकसेवा विभागालाच यापुढे फिडींग पॉईंट ठरविण्याचे अधिकार असतील.

३. नवीन तसेच पुनर्विकास होणा-या इमारतीसाठी वीज पुरवठयाची मागणी करण्या-यांसाठी आवश्यक असणा-या कागदपत्रांची / प्लॅनची संख्या कमी करण्यात आली आहे .

४. बेस्ट उपक्रमाच्या सर्व वीजग्राहकांनी तसेच उपक्रमातर्फे वीज पुरवठा घेऊ इच्छिणा-या सर्व संभाव्य ग्राहकांनी या योजनेचा कृपया लाभ घ्यावा.

.......